N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अकोला **P.S.(ठाणे):** बाळापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0419 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/05/2026 20:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Date From (दिनांक पासून):** 25/05/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/05/2026
**Time From (वेळेपासून):** 12:39 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/05/2026 **Time (वेळ):** 20:34 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 032
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/05/2026 20:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत वाडेगांव ,ता बाळापूर जि अकोला

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मिलींदकुमार बहाकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला,बाळापूर,अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला,बाळापूर,अकोला,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9158822676

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.योगेश तोताराम कापकर पद- ग्रामसेवक ग्रामपंचायत ग्राम पंचायत वाडेगाव | | | 1. श्रीसंजय घुगे याचे घरी, किरायाने बसेरा कलनी,अकोला, बाळापूर,अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री.सुभाष रामकष्ण सरप पद- लिपीक ग्रामपंचायत वाडेगांव ता बाळापूर | | | 1. रा वाडेगांव ,ता बाळापूर जि अकोला,बाळापूर,अकोला, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 60,000/रू | 60,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

60,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

नक्कल फिर्याद लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला दिनांक :- 25.05.2026 मी मिलींदकुमार बहाकर, वय 47 वर्षे, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला शासनातर्फे फिर्याद देतो की, दिनांक 08.05.2026 रोजी तक्रारदार श्री. सुरज उर्फ सन्नी गजानन हांडे, वय 31 वर्ष,शिक्षण-बी.ए., व्यवसाय-मॅनेजर, वैभव वाईन बार, वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला हे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे समक्ष हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांना त्यांचे तक्रारी बाबत प्रथम सविस्तर विचारपूस केली. त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांची तोंडी तक्रार नोंदवून घेण्याची विनंती केली. सदर तक्रारीवरुन पुढिल कार्यवाहीकरीता मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, अकोला यांना या कार्यालयाचे पत्र क्र. 624/2026, दिनांक 08.05.2026 अन्वये पत्र दिले. त्यावरून त्यांनी त्यांचे कार्यालयातील 1) श्री. सागर बन्सीलाल चाकर, पद-महसुल सेवक 2) श्री. कुणाल विश्वास सिरसाट, पद- महसुल सेवक यांना पंच म्हणून लाप्रवि. अकोला कार्यालयात पाठविले. नमुद दोन्ही पंचांनी सदर कार्यवाहीत पंच म्हणून काम करण्याची संमती दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत त्यांना तोंडी विचारपूस करण्यास सांगीतले. त्यावरून दोन्ही पंचांनी तक्रारदारास विचारणा केली. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांची तोंडी तक्रार कार्यालयीन लॅपटॉपवर टंकलिखित करण्यात आली. सदर टंकलिखित तक्रारीची प्रिंट आऊट काढून त्या तक्रारीवर तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांनी नोंदविलेली तक्रार व त्यांचेकडे तक्रारीसंबंधी तोंडी विचारपुस केलेला मजकुर सारखाच असल्याची आमची व दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर सदर तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांनी नोंदविलेल्या तक्रारीतील मजकुर खालीलप्रमाणे आहे.‘‘ मी आज दिनांक 08.05.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे समक्ष हजर येवुन तक्रार देतो की, मी वर नमुद पत्यावर परिवारासह राहत असुन माझे वडील श्री. गजानन हांडे यांच्या नावावर असलेल्या ‘वैभव वाईन बार’ वाडेगांव येथे मॅनेजर म्हणून कामकाज पाहतो. माझा सख्खा लहान भाऊ वैभव गजानन हांडे यांचे नांवे वाडेगाव येथे नविन ‘वैभव वाईन अॅन्ड बिअर शाॅपी’ या नावाने वाईन आणि बिअर शाॅपी उघडुन व्यवसाय करायचा आहे. त्याकरीता ग्रामपंचायत वाडेगांव यांचेकडुन नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअनुशंगाने मी दि. 11.04.2026 रोजी ग्रामपंचायत वाडेगावचे ग्रामसेवक श्री. योगेश कापकर यांना त्यांचे मोबाईलवर कॉल करुन विचारणा केली. तेव्हा ग्रामसेवक श्री. याेगेश कापकर यांनी मला म्हटले की, मी दुपारी तुझ्या बार जवळ येवून तुझ्याशी बोलतो. त्यानंतर दुपारी अंदाजे 02ः00 वाजताच्या सुमारास ग्रामसेवक श्री. योगेश कापकर हे मला वैभव वाईनबारच्या बाहेर मला येवून भेटले. त्यावेळी त्यांनी मला नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी ग्रामपंचायतला एक विनंती अर्ज आणि त्यासोबत जागेच्या भाडेकरारनामाची प्रत, नमुना आठ-अ, बांधकाम नकाशा ईत्यादी कागदपत्र आणुन दे. त्यावर मी त्यांना आम्ही तुम्हाला आवश्यक सर्व कागदपत्र आणुन देतो तुम्ही फक्त ग्रामपंचायतचे नाहरकत प्रमाणपत्र लवकर द्या असे म्हटले. तसेच त्यावेळी ग्रामसेवक श्री. योगेश कापकर यांनी मला म्हटले की, मी तुला नाहरकत प्रमाणपत्र देतो त्यासाठी तु मला एक लाख रुपये (अक्षरी 1,00,000/-रुपये) दे असे म्हटले. त्यावर मी नाईलास्तव ठिक आहे असे म्हटले.त्यानंतर अंदाजे 4 ते 5 दिवसानंतर माझी व सरपंच श्री. मंगेश तायडे यांची वाडेगांव येथे भेट झाली. त्यांना मी वर नमुद नाहरकत प्रमाणपत्राबाबत विचारले असता त्यांनी, ठिक आहे काही

N.C.R.B (एन.सी.आर.बी)


हरकत नाही असे म्हटले. त्याकरीता त्यांनी मला कुठल्याही प्रकारच्या रकमेची मागणी केली नाही. त्यानंतर मी दि. 29.04.2026 रोजी ग्रामपंचायत वाडेगाव येथे नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याकरीता विनंती अर्ज तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सादर केले.गैरअर्जदार श्री. योगेश कापकर, ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाडेगाव ता. बाळापूर जि. अकोला यांनी माझा भाऊ वैभव हांडे यांचे नांवे 'वैभव वाईन अॅन्ड बिअर शॉपी' या नावाने व्यवसाय सुरु करण्याकरीता ग्रामपंचायत वाडेगावचे नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी मागणी केलेली लाच रक्कम रू. 1,00,000/- त्यांना देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने मी त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. माझी त्यांचेशी कोणत्याही प्रकारची देवाण-घेवाण अथवा वैमनस्य नाही.''

तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांनी नोंदविलेल्या तक्रारी नुसार गैरअर्जदार श्री. योगेश कापकर, ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाडेगाव ता. बाळापूर जि. अकोला यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हॉईस रेकार्डरव्दारे लाच मागणीची पडताळणी दिनांक 13.05.2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 08.05.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर दिनांक 13.05.2026 चे 11.59 वा. ते 12.18 वा. दरम्यान गैरअर्जदार श्री. योगेश कापकर, ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाडेगाव ता. बाळापूर जि. अकोला यांची तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांच्याकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी ग्राम माझोड ता.जि. अकोला येथील मुख्य चौकात असलेल्या ईश्वरी कोल्ड्रींग अॅण्ड रसवंती येथे करण्यात आली.

सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही मध्ये गैरअर्जदार श्री. योगेश कापकर, ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाडेगाव ता. बाळापूर जि. अकोला यांनी तक्रारदाराच्या भावाच्या नांवे ग्राम वाडेगाव येथे नविन 'वैभव वाईन अॅन्ड बिअर शॉपी' या नावाने वाईन आणि बिअरशॉप सुरू करण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांच्याकडे पंचासमक्ष रू. 1,00,000/- लाच रकमेची मागणी करून तडजोडीअंती रू. 60,000/- लाच रकमेची मागणी केली. तसेच सदरची लाच रक्कम शनिवार दिनांक 16.05.2026 रोजी आणून देण्यास सांगीतले. त्यावरून गैरअर्जदार यांचेविरूध्द पुढील सापळा कार्यवाही दिनांक 16.05.2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 13.05.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर दिनांक 16.05.2026 चे 18.16 वा. ते 18.56 वा. दरम्यान गैरअर्जदार श्री. योगेश कापकर, ग्रामसेवक यांचेविरूध्द ग्रामपंचायत वाडेगांव ता. बाळापूर जि. अकोला येथे सापळा रचण्यात आला. सदर सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. योगेश कापकर, ग्रामसेवक यांनी तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांचे वैभव बार जवळ, बाळापूर रोड, वाडेगांव येथे येवून नाहकत प्रमाणपत्राकरीता आवष्यक असलेला भाडे करारनाम्याची तारीख बदलून दुसरा घेवून येण्यास सांगून गैरअर्जदार श्री. योगेश कापकर, ग्रामसेवक यांनी तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 60,000/-  श्री. सुभाष सरप, लिपीक, ग्रामपंचायत वाडेगांव यांचेकडे देण्यास सांगीतले. दिनांक 16.05.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 3 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर आज दिनांक 25.05.2026 चे 12.39 वा. ते 13.04 वा. दरम्यान ग्रामपंचायत वाडेगांव   ता. बाळापूर जि. अकोला येथे सापळा रचण्यात आला. सदर सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. योगेश तोताराम कापकर, ग्रामसेवक यांनी तक्रारदार श्री. सुरज गजानन हांडे यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 60,000/- तक्रारदाराकडून पंचासमक्ष स्विकारून श्री. सुभाष सरप, लिपीक, ग्रामपंचायत वाडेगांव यांचेकडे दिली. श्री. सुभाष सरप, लिपीक यांनी सदरची लाच रक्कम स्विकारून लाच रकमेच्या व्यवहारास प्रोत्साहन दिले. त्यानंतर श्री. सुभाष सरप, लिपीक यांना लाच रकमेसह ताब्यात घेवून लाच रक्कम रू. 60,000/- श्री. सुभाष सरप, लिपीक यांचेकडुन दोन्ही पंचासमक्ष जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आली. दिनांक 25.05.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 4 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.करीता आरोपी क्र. 1) श्री. योगेश तोताराम कापकर, पद-ग्रामसेवक (ग्रामपंचायत अधिकारी), ग्राम पंचायत वाडेगाव ता. बाळापूर जि. अकोला वर्ग-3, रा.वंजारीपूरा आलेगांव ता. पातुर जि. अकोला, ह.मु. श्री. संजय घुगे यांचे घरी किरायाने बसेरा कॉलनी, अकोला व आरोपी क्र. 2) श्री. सुभाष रामकृष्ण सरप, वय 57 वर्ष, पद- लिपीक, ग्रामपंचायत वाडेगांव ता. बाळापूर जि. अकोला, रा.वाडेगांव ता. बाळापूर जि. अकोला यांचे हे कृत्य कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 अन्वये गुन्हा होत असल्याने माझी त्यांचे विरूध्द शासनातर्फे कायदेषीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Prakash Laxman Zodge(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

***District* (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Prakash Laxman Zo(

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

HC 396

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**